करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३१ | पाने-१२ | दि.२३/०५/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.







## करमाळा तालुक्यात ऐतिहासिक पाऊस

# ३५७ ते ६३६ टक्के पावसाची नोंद - तरीही नऊ टँकर सुरू

करमाळा : यावर्षी तालुक्यामध्ये ऐतिहासिक पाऊस झाला असून आजपर्यंतच्या इतिहासात प्रथमच मे महिन्यात एवढा मोठा पाऊस पडला आहे. तालुक्याच्या पावसाची सरासरी २५.४ मिलीमीटर एवढी आहे. परंतु मे महिन्यात हा पाऊस सर्वात कमी करमाळा येथे ९०.९ मिलीमीटर तर सर्वात जास्त जेऊर व उमरड येथे १६१.७ मिलीमीटर एवढी नोंद झाली आहे. पावसाच्या टक्केवारीचा विचार करता हा पाऊस करमाळा येथे ३५७.९ टक्के तर जेऊर व उमरड येथे ६३६.६ टक्के झालेला आहे. १२ मे ला सुरु झालेला पाऊस कधी विश्रांती तर कधी




जोरात असा सुरू आहे. १३ मे ला सर्वात जास्त पावसाची नोंद आहे.

करमाळा तालुक्याच्या इतिहासात या पावसाची नोंद घेण्याइतका पाऊस प्रथमच झाला आहे. सरासरीच्या चार ते सहापट पाऊस झालेला आहे. या पावसाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याबरोबरच वादळी वाऱ्यात केळीचे झाडे पडून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसात पांगरे, उमरड, शेलगाव (वांगी), सावडी या ठिकाणी वीज पडून तीन गायी, एक शेळी व एक म्हैस मृत्यूमुखी पडले आहेत. सुदैवाने मनुष्यहानी झालेली नाही. असे असलेतरी यामध्ये उमरड येथील उमरड येथील रघुनाथ भिसे यांची म्हैस,

**पाऊस (मिलीमीटर मध्ये)**

| मंडल | सरासरी | एकूण | टक्के | दिवस |
|---|---|---|---|---|
| करमाळा | २५.४ | ९०.९ | ३५७.९ | ४ |
| अर्जुननगर | २५.४ | ९७.८ | ३८५ | ६ |
| केम | २५.४ | १४८.६ | ५८५ | ४ |
| जेऊर | २५.४ | १६१.७ | ६३६.६ | ६ |
| सालसे | २५.४ | १४९.६ | ५८९ | ५ |
| कोर्टी | २५.४ | ११३.७ | ४४४.६ | ७ |
| उमरड | २५.४ | १६१.७ | ६३६.६ | ६ |
| केत्तूर | २५.४ | ९५.३ | ३७५.२ | ४ |

पांगरे येथील तुकाराम पिसाळ यांची गायी, शेलगाव(वांगी) येथील भामाबाई (पान ३ वर)







Scanned with OKEN Scanner

दळणवळणाची योग्य सोय असल्याशिवाय आर्थिक प्रगती होत नाही !

**संपादकीय.......................................!**

# रस्ता..

करमाळा तालुक्यातील पोलीस स्टेशनच्या फिर्यादीचा आढावा घेतला असता, दर महिन्याला कमीत कमी पाच फिर्यादी असे असतात, की ज्यामुळे रस्त्यावरून मारहाण झालेली आढळून येते. रस्त्यावरून अनेक बाबी घडत आहेत. सध्या तहसील कार्यालय मध्ये रस्त्यांच्या प्रकरणाचा आढावा घेतला असता, मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ कलम ५ अन्वये १८९ प्रकरणे सुरू आहेत. तर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम १४३ अन्वये जवळपास ३४ प्रकरणे सुरू आहेत. म्हणजे तालुक्यातील जवळपास २५० प्रकरणे रस्त्याची सुरू आहेत. एवढेच नाहीतर करमाळा न्यायालयातील खटल्यांचा अभ्यास केला असता, तहसीलदारांनी मंजूर केलेले रस्ते रद्द होवून मिळण्याचे शेकडो दावे सध्या न्यायालयात सुरू आहेत. एकंदरीत रस्ता हा अत्यंत महत्वाचा प्रश्न बनलेला आहे.

रहदारीच्या हालचालीसाठी जो एक पट्टा तयार केलेला असतो त्याला आपण रस्ता म्हणतो. रस्ता हा प्रामुख्याने वाहतुकीच्या हालचालीसाठी वापरला जातो. दोन किंवा अधिक ठिकाणा दरम्यान मोटारवाहन, सायकल, गाडी आदींनी प्रवास करण्यासाठी बनवलेला गुळगुळीत किंवा फरसबंदी केलेला लांब अरूंद भाग म्हणजे रस्ता होय. कोणत्याही देशाचा रस्ता हा त्या देशाच्या सर्वांगीण विकासात महत्वाची भुमिका बजावतो. सर्वात महत्वाचे म्हणजे भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा देश आहे की ज्याचे रस्त्याचे जाळे सर्वाधिक आहे. भारतात वाहतुकीचे सर्वात महत्वाचे साधन रस्ता हे आहे.

सध्या प्रसिध्दीच्या झोतात असलेले रस्ते म्हणजे एक्सप्रेस वे , राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते आणि शेत रस्ते याचा समावेश होतो.

एक्सप्रेस वे : हा असा रस्ता आहे, ज्यावर एकाचवेळी सहा ते आठ वाहने प्रवास करू शकतात. या रस्त्याच्या लेनची संख्या सहा ते आठ असते. चकचकीत रस्ते आणि सुरक्षा यामुळे या मार्गावर दुप्पट वेगाने वाहने चालतात. त्याचे बांधकाम आणि देखभालीचे काम वाहतुक आणि महामार्ग मंत्रालयद्धारे केले जाते. त्याचा टोलही जास्त असतो.

राष्ट्रीय महामार्ग : ज्या रस्त्यांना प्रामुख्याने महामार्गाचा दर्जा प्राप्त झालेला आहे ते रस्ते. देशातील विविध राज्य आणि प्रमुख शहरांना हे रस्ते जोडले जातात. राष्ट्रीय महामार्गाची रूंदी ७ ते १५ मीटर पर्यंत असते.

राज्य मार्ग हे प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्याच्या ठिकाणी व राज्यातील प्रमुख शहरांना जोडले जातात. तर जिल्हा रस्ते हे प्रामुख्याने जिल्हा परिषद व जिल्ह्यातील मुख्य शहरे राज्य मार्ग व राष्ट्रीय महामार्ग यांना जोडली जातात.

ग्रामीण रस्ते जे रस्ते कोणत्याही गावाला, जिल्हा रस्त्याला जोडलेले असतात. त्यांना पंचायत किंवा ग्रामीण रस्ते म्हणतो. यावर फक्त हलक्या वाहनांची वाहतूक असते. ग्रामीण भागातील विकासात या रस्त्याची भुमिका महत्वाची असते.

परिस्थितीनूसार या रस्त्यांची नांवे ही वेगवेगळी पडलेली असतात. यामध्ये शेती रस्ते, मातीचे रस्ते, जंगलचे रस्ते, रेतीचे रस्ते, ऐतिहासिक रस्ते, पायवाट, बर्फाळ रस्ते असेही रस्त्याचे प्रकार आहेत. काही शासकीय रस्ते असतात तर काही खाजगी रस्ते असतात. रस्त्याचे प्रकारही वेगवेगळे आहेत. कॉंक्रीटचे रस्ते, डांबरी रस्ते, कंकरीचे रस्ते, मातीचे रस्ते, मुरूम रस्ते, कांकर रस्ते, बिटूमीनस रस्ते असे वेगवेगळ्या प्रकारचे रस्ते बनवले जातात.

ग्रामीण भागात शिव रस्ते आणि पाणंद रस्ते हे अत्यंत महत्वाची आहेत. दोन गावांना जोडणारी जी सीमारेषा आहे त्याला शिव म्हणतात. त्या ठिकाणी ३३ फुटाचा रस्ता ठेवलेला आहे. परंतु दोन्ही बाजुच्या शेतकऱ्यांनी हे रस्ते भुईसपाट केलेले आहेत. पाणंद रस्त्याचीही तिच गत आहे. पाणंद रस्ता म्हणजे कच्चा रस्ता जो शेत आणि गावाला जोडलेला असतो. या रस्त्याचा वापर शेतकरी शेतामध्ये जाण्यासाठी व शेतीचे काम करण्यासाठी करत असतात. पाणंद रस्ता हा माती किंवा खडीने बनविलेला असतो. पाणंद रस्त्याची रूंदी कमी-जास्त असू शकते. अगदी १२ फुटापासून ते ३३ फुटापर्यंतही असू शकते. पूर्वी पासून या रस्त्यावरून शेतकऱ्यांची वहिवाट चालू होती. परंतु शेती बागायत होत गेली. शेतीत यांत्रिकीकरणाचा विशेषत: ट्रॅक्टरचा वापर सुरू झाला आणि मग पाणंद रस्ते अरूंद होत होत काही ठिकाणी ते नष्टही झालेले आहेत. शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्त्याप्रमाणेच शेत रस्ता, गाडी मार्ग, पाऊल मार्ग हे ही महत्वाचे असतात. गाव नकाशात तुटक रेषेने जे दर्शविलेले असतात ते पायमार्ग किंवा पाऊल वाट असते. त्याची रूंदी सव्वाआठ फुट आहे. गाडीमार्ग जो आहे तो गावनकाशामध्ये तुटक दुबार रेषेने दाखवलेला असतो. अशा रस्त्याचे क्षेत्र ते ज्या भुमापन क्रमांकातून जात आहेत त्या भुमापन क्षेत्रात समाविष्ट केलेले असते. या रस्त्याची नोंदणी साडेसोळा ते एकवीस फूट रूंद असते. गाव रस्ता हा गाव नकाशात दोन भरीव रेषेने दाखवलेला असतो. या रस्त्याची रूंदी एकसमान नसून वेगवेगळी असते. विशेष म्हणजे भुमिअभिलेख कार्यालयात त्याची नोंद असते.

पूर्वी शेती जिरायत असायची तसेच शेतीत यांत्रिकीकरणाचा वापर नसायचा. तसेच लोकसंख्या कमी व एकत्र कुटूंब पध्दती होती. त्यामुळे बहुतेक परिवाराला जमिनी जास्त असायच्या. त्यामुळे रस्त्यासाठी वाद नव्हते. अलिकडे यांत्रिक युग आले. शेतीत यंत्राचा वापर सुरू झाला. शेती बागायत झाली. पाण्यासाठी बोअरवेलचा वापर सुरू झाला. जमिनीतून उत्पन्न काढण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली. एकत्र कुटूंब पध्दती जवळपास संपुष्टात आलेली आहे. आणि प्रत्येक परिवाराचे जमिनीचे क्षेत्र कमी कमी झाले आहे. त्यामुळे आहे त्या जमिनीतून रस्ता देणे अशक्य होत चालले आहे. अनेकांनी स्वत:ला जास्त जमीन वहिवाटण्यास मिळण्यासाठी पूर्वपार असलेले पाणंद रस्ते, शिव रस्ते, गाव रस्ते शेतकऱ्याने नांगरूण मोडून त्याची जमीन केली आहे. त्यामुळे अलिकडे रस्त्याचे प्रश्न वाढत चालले आहेत. रस्ता असेलतर जमिनीला किंमत. अनेकवेळा रस्त्याकरीता १ गुंठा जमीन लागत असेलतर त्या गुंठ्याला एका एकराची किंमत द्यावी लागते. अशी स्थिती निर्माण झाली आहे. याचा गैरफायदा घेणेच्या उद्देशाने अनेक शेतकऱ्यांनी दुसऱ्या शेतकऱ्याला आडवून रस्ता मोडून पैसा मिळवण्याचा मार्ग शोधला आहे. अशा स्थितीतच तहसील कचेरी व न्यायालयीन खटल्याची वाढ झालेली आहे. जे रस्ते पूर्वी अस्तित्वात होते परंतु लगतच्या शेतकऱ्यांनी मोडले आहेत ते रस्ते खुले करून मागणी अर्ज हा मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ कलम ५ प्रमाणे केला जातो. जर ज्या शेतकऱ्यांना जाण्यासाठी पूर्वीपासून अधिकृत रस्ता नव्हता अशांकरीता लगतचा व दोन बांधावरून रस्ता हा महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम १४३ प्रमाणे नवीन रस्ता मागता येतो. याबाबतचे अधिकार तहसीलदार यांना आहेत. तहसीलदारांनी रस्ता मंजूर केला किंवा खुला करण्याचा आदेश दिला तर त्यावर दिवाणी न्यायालयात एक वर्षाच्या आत अपील करता येते. तसेच उपविभागीय अधिकारी यांचेकडेही अपील /रिव्हीजन करता येते. अलिकडे शासनाने पाणंद रस्ता सुधारण्यासाठी मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे. शासनाच्या माध्यमातून रस्त्याचे संवर्धन करण्याचा हा एक मार्ग आहे. या योजनेनूसार शेततळी, पाझर तलाव, बंधारे, त्यातून निघणारा गाळ, माती, मुरूम, दगड हे पाणंद रस्त्यासाठी विनामुल्य व सहज उपलब्ध होणारे आहेत.

विशेष बाब म्हणजे राज्यशासनाच्या महसुल व वनविभागाने २२ मे २०२५ रोजी शेत रस्त्याबाबत नवीन जीआर प्रसिध्द केला आहे. यामध्ये कलम १४३ नूसार शेतीमधील वाढत्या यांत्रिकींकरणाच्या अनुषंगाने पारंपारिक अरूंद शेत रस्त्याऐवजी किमान तीन ते चार मीटर रूंद असलेले शेत रस्ते उपलब्ध करून देण्याचा आदेश दिला आहे. शेतामध्ये ट्रॅक्टर, रोटावेटर अशी वाहने सहज जातील, याकरीता शेत रस्त्याची रूंदी ही किमान तीन ते चार मीटर उपलब्ध करून द्यावी; असे म्हटले आहे. जेथे शक्य नाही तिथे जास्तीत जास्त रूंदीचा रस्ता उपलब्ध करून द्यावा किंवा पर्यायी लांबचा रस्ता देण्यात यावा; असेही म्हटले आहे. तसेच कलम १४३ व मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ नूसार वहिवाटीच्या रस्त्यावरील अडथळा दूर करण्यासाठी मनाई हुकूम दिलेल्या शेत रस्त्याची अधिकृतपणे सातबाराच्या इतर हक्कामध्ये नोंद करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये शेत रस्त्याची रूंदी, लांबी, दिशा व सीमा इ. स्पष्टपणे नमूद करावेत असेही म्हटले आहे. एवढेच नाहीतर तहसीलदार समोर आलेल्या या दोन्ही प्रकरणाचे निकाल अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसात निकाली काढावेत; असेही या जीआर मध्ये म्हटले आहे. या शासन निर्णयामुळे शेतकऱ्यांना योग्य व वेळेत न्याय मिळेल; अशीही अपेक्षा करायला हरकत नाही.

शरीरामध्ये रक्त वाहण्यासाठी ज्या रक्तवाहिन्या महत्वाच्या आहेत तशाच प्रकारे प्रगतीसाठी रस्ते असणे आवश्यक आहे. रस्त्याची गरज ही प्रत्येक व्यक्तीला आणि शेतकऱ्याला असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपली सोय झाल्यानंतर इतरांची गैरसोय करण्याचे काम बंद केले पाहिजेत अन्यथा रस्ते बंद पडले तर सर्वांचीच प्रगती एक दिवस थांबणार आहे; याचाही विचार करणे आवश्यक आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

# आरोग्य विषयक उपक्रम कौतुकास्पद : संदीप मोहिते



करमाळा(सं.प्र.) : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात हिरक आरोग्य वर्ष साजरा होत आहे. यानिमित्त संपूर्ण राज्यात सुरू असलेलं आरोग्य विषयक उपक्रम कौतुकास्पद आहे; असे मत प्रसिध्द सिनेनिर्माते संदीप मोहिते यांनी व्यक्त केले

करमाळा येथील लहान मुलांच्या हृदयाच्या तपासणी आरोग्य शिबीर प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, उपतालुका प्रमुख डॉ.गौतम रोडे, बाळासाहेब वाघ, सतीश रूपनवर, ओबीसी आघाडी अध्यक्ष अंकुश जाधव, युवा सेना उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत राखुंडे, वैद्यकिय कक्ष प्रमुख दिपक पाटणे, नागेश चेंडगे, अजय पुराणिक आदीजण उपस्थित होते. एकनाथ हिरक आरोग्य वर्ष अंतर्गत कु.मुक्ताई मंगेश चिवटे हिच्या वाढदिवसानिमित्त करमाळा शहर व तालुक्यातील लहान मुलांकरीता मोफत 2D इको तपासणी व मोफत हृदय शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४७ लहान मुलांची नोंदणी करण्यात आली असून ज्या लहान पुढे शस्त्रक्रियेची गरज असेल त्यांना मुंबई येथील प्रसिध्द बालाजी हॉस्पिटल येथे मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.या शिबीरात १०० पेक्षा अधिक मुलांची नोंदणी झाली होती. मुलांची तपासणी मुंबईतील बालाजी हॉस्पिटल मार्फत करण्यात आली. शिबीरासाठी उपजिल्हा रुग्णालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम टीमने परिश्रम घेतले.

हॉल भाड्याने देणे आहे
ट्युशन (शिकवणी) करीता तासिका तत्वावर माफक दरात
23 x 10 साईजचा हॉल भाड्याने देणे आहे.
पत्ता : सह्याद्री प्लाझा, म.गांधी हायस्कुल जवळ, घोलपनगर, करमाळा.
संपर्क : मो.9561653557, 9011361156

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
पाटील
Reg no.42433
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर अॅन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
• सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार


पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

पान १ वरून पुढे...

# करमाळा तालुक्यात ऐतिहासिक पाऊस

देशमाने यांची गायी, सावडी येथील तुकाराम काकडे यांची शेळी, झरे येथील भारत चौधरी यांची गायी, मारूती बोराडे यांची शेळी मयत झाली आहे. तर सावडी येथील रामदास तळेकर यांच्या घरावरील पत्रे उडाले आहेत. या पावसात आणि वादळी वाऱ्यात तालुक्यातील विद्युत पुरवठ्यावर मोठा परिणाम झालेला आहे. लघुवाहिनीवरील ३८ तर मोठ्या वाहिनीवरील १२ खांब कोसळल्याने वीज पुरवठा विस्कळीत झाला आहे. परंतु वीज कर्मचारी त्यासाठी प्रयत्नशील असल्याने ही कामे जवळपास पूर्ण होत आली आहे.

## तरीही नऊ टँकर सुरु

करमाळा तालुक्यात ऐतिहासिक पाऊस झाला असलातरी जमीनखालील पाणी पातळी वाढलेली नाही. त्यामुळे तालुक्यात केम, वरकुटे, तरटगाव, साडे, घोटी, निंभोरे, पाथुर्डी, पाडळी, फिसरे या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू आहेत.

## पाऊस झाला असलातरी पेरणीची घाई करू नका

पाऊस झाला असलातरी पेरणीची घाई करू नका; असे आवाहन प्र.तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण यांनी केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. जास्त पाऊस असलातरी हा पेरणी इतका पुरेसा पाऊस नाही. पेरणीसाठी जमिनीत खोलवर ओल जाणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन महिना उजाडे पर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये; असे आवाहन करण्यात आले आहे.

धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित
College Code : 1384

श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.
ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !
G.N.M. डिप्लोमा कोर्स
प्रवेश देणे सुरू
• कालावधी : ३ वर्षे
• शैक्षणिक पात्रता...
१२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)
मान्यताप्राप्त..
• महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
• महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
• महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई
■ १००% नोकरीची हमी
■ सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
■ फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
■ जॉब प्लेसमेंट
■ हॉस्टेल सुविधा
■ हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
■ इंग्लिश स्पीकींग क्लासेस

सुविधा...
• राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
• मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
• प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
• सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
• अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
• एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.
पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२९९५४७, ९५४५६२०९९९

२४ तास आपल्या सेवेत
मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.
डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील M.B.B.S. (Gen.Physician)
यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी
सुविधा : अॅडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान
मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ
टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा
तपासणी फी फक्त Rs.100/-
पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३१५१३

Scanned with OKEN Scanner

भाड्याने देणे आहे
करमाळा शहरातील वेताळपेठ मधील घर व दुकान जागा भाड्याने देणे आहे
संपर्क : मो.9420093303

# खरीप हंगाम पूर्वतयारी बैठकीला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने आयोजित खरीप पूर्वतयारी बैठक कुंभेज फाटा येथील सुप्रिम मंगल कार्यालयात पार पडली. या बैठकीला तालुक्याच्या सर्व भागातील शेतकऱ्यांनी हजेरी लावली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार नारायण पाटील हे होते. तसेच माजी प्राचार्य जयप्रकाश बिले, चिखलठाण सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे, कुर्डूवाडीचे उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, पं.स.कृषी विभागाचे संभाजी पवार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष संतोष वारे आदी मान्यवर उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. मंडल कृषी अधिकारी अनिल चव्हाण, मधुकर मारकड, काशिनाथ राऊत यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगामातील पीकपध्दती बाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी पर्यवेक्षक उमाकांत जाधव, प्रवीण दगडे, राजेंद्र खाडे, महेश काळे, प्रताप तळेकर, संदीप गायकवाड, महेश रानजुंण, कोकणी, दत्तात्रय गायकवाड, जिल्हा संसाधन व्यक्ती मनोज बोबडे, आत्माचे सत्यम झिंजाडे, अक्षय नाळे, गणेश गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त २८ मे ला भव्य रक्तदान शिबीर

करमाळा (सं.प्र.) : वीर शिरोमणी हिंदूसुर्य श्री महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५ व्या जयंतीनिमित्त करमाळा येथे २८ मे ला भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत सुतारगल्ली, करमाळा येथे संपन्न होणार आहे. शिबीरात सहभागी रक्तदात्यास लकी ड्रॉ जिंकण्याची संधी असून प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तूही दिली जाणार आहे. तरी या शिबीरात जास्तीत जास्त संख्येने रक्तदात्यांनी सहभागी व्हावे; असे आवाहन आयोजक सकल क्षत्रिय राजपुत समाज व श्री हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## दहावीच्या परीक्षेत सलग नऊ वर्षे डी.जी.पाटील विद्यालयाचा १०० टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.) : संगोबा रोड, येथील डी.जी. पाटील विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल लागला असून ही परंपरा सलग नऊ वर्षे कायम ठेवली आहे. या परीक्षेत विद्यालयात अथर्व अमोल राठोड (९६.२०%) याचा प्रथम तर सुजल बापू दौंडे (९१.६०%) याचा द्वितीय क्रमांक आला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील तसेच मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी केले.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

* काशी दर्शन यात्रा *
काशी, गया, अयोध्या, प्रयाग,
दि. २५/०७/२०२५ ते ०२/०८/२०२५
सहल खर्च - १४८००/-

* २ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा *
उज्जैन, ओंकारेश्वर, मंडलेश्वर, महेश्वर, इंदौर
दि. ०३/०८/२०२५ ते ०८/०८/२०२५
सहल खर्च- ८५००/-

* कन्याकुमारी *
कन्याकुमारी,त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्
दि. ११/०८/२०२५ ते १८/०८/२०२५
सहल खर्च- १००००/-

* तिरुपती बालाजी दर्शन विमान यात्रा *
तिरुपती बालाजी, गोविंदराज, पद्मावती माता
दि. १९/०८/२०२५ ते २२/०८/२०२५
सहल खर्च ९९९९/-

* वैष्णोदेवी दर्शन यात्रा *
वैष्णोदेवी, अमृतसर,आग्रा,मथुरा, गोकुळ,वृंदावन,
दि. ०९/०९/२०२५ ते १८/०९/२०२५
सहल खर्च १३८००/-

* चारधाम यात्रा *
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ हरिद्वार, ऋषीकेश
दि. ०३/१०/२०२५ ते १७/१०/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च ३५०००/- 3 AC

* केरळ दर्शन *
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार, त्रिवेंद्रम मदुराई, रामेश्वरम,कन्याकुमारी
दि. २३/१०/२०२५ ते ०४/११/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च ३३०००/- 3 AC

गिरनार पर्वत, जुनागड,
सोरटी सोमनाथ, पोरबंदर, नागेश्वर ज्योतिर्लिंग, द्वारकाधाम
दि. ०६/११/२०२५ ते १३/११/२०२५
सहल खर्च- ११५००/-

* गंगासागर दर्शन *
गंगासागर, कलकत्ता, श्री जगन्नाथपुरी धाम कोणार्क, भुवनेश्वर, साक्षीगोपाल
दि. १६/११/२०२५ ते २४/११/२०२५
सहल खर्च १२८००/-

* नेपाळ *
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, मनोकामना, काठमांडू, लुंबिनी, अयोध्या, प्रयागराज
दि. ०५/१२/२०२५ ते १८/१२/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च २७५०० /- 3 AC

* रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय
अधिक माहितीसाठी संपर्क
8888333638/8698333638 / 7218333638

महात्मा गांधी ज्युनियर कॉलेजची विद्यार्थीनी

## नमिरा फकीर इंग्रजी विषयात पुणे बोर्डात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील महात्मा गांधी ज्युनियर कॉलेजची विद्यार्थीनी फकीर नमिरा इन्नुस हिला इंग्रजी विषयात पुणे बोर्डात प्रथम आल्याबद्दल डॉ.बापुजी साळुंखे पारितोषिक व श्रीमती सिताबाई काळे पारितोषिक देऊन पुणे बोर्डाकडून सन्मानित करण्यात आले. तसेच पुणे बोर्डाने पत्राद्वारे कळवून पारितोषिक रकमेचा धनादेश पाठवून तिचे अभिनंदन केले. म.गांधी ज्युनियर कॉलेजची विद्यार्थीनी नमिरा फकीर ही बारावीच्या परीक्षेत ९२.१७ टक्के गुण मिळवून करमाळा तालुक्यात प्रथम आली आहे. तसेच इंग्रजी विषयात १०० पैकी ९५ गुण मिळवून पुणे बोर्डात प्रथम येण्याचा मान मिळवला. करमाळा तालुक्यातील व कॉलेजच्या इतिहासात इंग्रजी विषयात हा सन्मान मिळवणारी ती पहिली विद्यार्थीनी ठरली आहे. हे यश मिळवण्यासाठी तिला इंग्रजी विषयाचे प्रा.दत्तात्रय भागडे यांचे मार्गदर्शन लाभले. या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त वैभवराजे जगताप, शंभुराजे जगताप, प्राचार्य बी.के.पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक रमेश भोसले, पर्यवेक्षिका सुनिता नवले, विज्ञान विभाग प्रमुख प्रा.विजय पवार, सर्व शिक्षक- शिक्षिका व कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलिंग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

Scanned with OKEN Scanner

# शेतकऱ्यांना भविष्यातही वीजेची कमतरता भासू देणार नाही : आ.पाटील



करमाळा(सं.प्र.): आपल्या इतकी वीजेची कामे दुसऱ्या कोणी केली नसून तालुक्यातील शेतकऱ्यांना भविष्यातही वीजेची कमतरता भासू देणार नाही; असे ठाम प्रतिपादन आमदार नारायण पाटील यांनी केले.

शेटफळ येथील अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसवण्याच्या कामाच्या भुमीपूजन कार्यक्रमात आमदार पाटील बोलत होते. शेटफळ येथील ३३/११ उपवीज केंद्राचे सक्षमीकरण करण्यासाठी येथे ५ एम.व्ही क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसवण्याच्या कामाचे भूमीपूजन आ.पाटील यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दशरथ लबडे हे होते. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले, की कृषी पंपाच्या वीज कनेक्शनसाठी आता डिपी दिले जात नाहीत. सोलरचा पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला जातो. परंतु सोलरच्या माध्यमातून वीजेसाठी शेतकरी स्वावलंबी होईलच असे नाही. ज्याच्या त्याच्या क्षेत्र गणतीनूसार वीजेची मागणी चालूच राहणार आहे. येत्या काही दिवसात दहिगाव व लवडे येथेही ५ एम.व्ही क्षमतेचे अतिरिक्त फिडर बसवले जाणार आहे. वांगी नं.१ येथेही लवकरच ५ एम.व्हीचा आणखी एक फिडर कार्यान्वीत होईल. कुंभेज येथील नियोजित मंजूर असलेल्या ३३/११ उपवीज केंद्राची जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आता पुढील उभारणीचे कामही लवकरच सुरू होईल. ढोकरी येथेही ३३/११ उपवीज केंद्राची उभारणी होईल. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे वीजेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण खंबीर असल्याचे आमदार नारायण पाटील यांनी सांगितले.

प्रास्ताविक सुनील तळेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार उपसरपंच आनंद नाईकनवरे यांनी मानले.

## करमाळा नगरपरिषद, करमाळा.

### जाहीर प्रसिध्दीकरण

(महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये जाहीर सूचना)

करमाळा शहरातील मिळकतधारकांना सुचित करण्यात येते, की पावसाळ्याचे दिवस येत आहेत. आपल्या इमारतीचा कोणताही भाग धोकादायक स्थितीत, पडावयास झालेला असल्यास अथवा काही भाग अर्धवट पडलेल्या स्थितीत असल्यास तो भाग त्वरीत काढून टाकावा. सदरच्या पडावयास झालेल्या भागाची किरकोळ दुरूस्ती असेलतर ती नगरपरिषदेची पूर्वपरवानगी घेवून पडावयास झालेल्या किंवा जीर्ण अवस्थेत असलेल्या भागाची दुरूस्ती करून घ्यावी. जुने बांधकाम पाडून नवीन बांधकाम करावयाचे झाल्यास तसे विहित प्रस्ताव नगरपरिषदेकडे दाखल करून रितसर परवानगी घेवून बांधकाम करावे.

आपले घरातील तसेच अन्य रहिवाशांच्या जीविताचे रक्षण करावे. रस्त्याच्या कडेस धोकादायक इमारत असल्यास रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरीकांचे जीवितास कोणताही धोका पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. याकामी संबंधित नागरीकांनी वेळीच दक्षता न घेतल्यास कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. धोकादायक इमारतीमुळे कोणतीही वित्तीय अगर जीवितहानी झाल्यास मिळकतधारकांची जबाबदारी राहील; याची नोंद घ्यावी.

धोकादायक इमारतीबाबत किंवा जागेबाबत वाद असल्यास न्यायालयाचे कोणतेही आदेश असल्यास त्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी. धोकादायक इमारतीबाबत न्यायालयाचे निदर्शनास आणून न्यायालयाची पूर्वपरवानगी घेवून कार्यवाही करण्यात यावी. याबाबत स्पष्ट नोंद घ्यावी. नगरपरिषदेस सहकार्य करावे.

मुख्याधिकारी
करमाळा नगरपरिषद

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu)
(Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A
• मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
• डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
• Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३
रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !

खुशखबर दर सोमवारी मुळव्याध इंजेक्शन (Scelro - Theropy) खुशखबर
फक्त 10,000/- मध्ये पहिल्या पाच पेशंटसाठी मर्यादित !
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
मो.9763035862
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

ओपीडीचे वैशिष्ट्ये...
• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा
• प्रभावी औषधी सुविधा
• मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
• आठवड्यातून दोनदा ओपीडी • पार्किंगची व्यवस्था
सुचना १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# रस्ते दुभाजकासह सुशोभिकरणासाठी ५० लाख मंजूर

करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ रोडमध्ये सव्वा मीटर अंतराचा रोड दुभाजक करून त्यात स्ट्रीट लाईट लावून वृक्षारोपण करणे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी संरक्षक जाळी लावून अबालवृध्दांसाठी पदपाथ तसेच लहान मुलांसाठी खेळणी आदींसाठी ५० लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. याचे इस्टिमेट करून लवकरच काम सुरू होईल; अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री कार्यालयाचे कार्यालय प्रमुख मंगेश चिवटे यांनी या रस्त्यावर सातत्याने होणारे अपघात, लाखो भक्तांची वर्दळ व भावी काळात होणारे अपघात टाळण्यासाठी रोड दुभाजक व सुशोभिकरणाची गरज असल्याची बाब सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निदर्शनाला आणून दिली होती. भोसले यांनी या रस्त्याला ५० लाख रूपये मंजूर केले. श्री कमलाभवानी मंदिराला जाणारा रस्ता लाखो भक्तांच्या रहदारीचा आहे, तो सुशोभिकरण करून अपघातमुक्त करण्याची मागणी शहरवासियांनी वारंवार पालिकेकडे केली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सोलापूर विभागाचे वरीष्ठ अभियंता माळी, विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनीता पाटील, बांधकाम विभागाचे उपअभियंता रमेश पवार या सर्वांच्या प्रयत्नामुळे रस्त्याला निधी मंजूर झाला आहे.

श्रीदेवीचामाळ रस्त्यावर वारंवार अपघात होऊन अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. नवरात्रात या रस्त्यावरून लाखो देवीचे भक्त ये-जा करतात. आषाढी वारीसाठी लाखो पंढरपूरचे भक्त या रस्त्यावरून जातात. या रस्त्याला प्रचंड उतार असल्यामुळे मोठा अपघात होऊन मोठी जीवितहानी होण्याची भीती होती. आता मात्र हा रस्ता अपघातमुक्त होणार आहे.

## करमाळा नगरपरिषद, करमाळा.

### जाहीर आवाहन

करमाळा शहरातील, हद्दीबाहेरील व अतिक्रमण भागातील सर्व नळसंयोजन धारकांना कळविण्यात येते की, काही तांत्रिक अडचणींमुळे नगरपरिषदेकडील पाणी बिलांचे वाटप करण्यात आलेले नव्हते. सध्या तांत्रिक अडचण निवारण झालेमुळे पाणी बिल भरणा करून घेणेची सोय करण्यात आलेली आहे. तरी सर्व नळ संयोजन धारकांनी नगरपरिषदेमध्ये येऊन दि.१६ जून पर्यंत पाणी बिलांची रक्कम भरून नगरपरिषदेस सहकार्य करावे.

मुख्याधिकारी - करमाळा नगरपरिषद

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा | पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा | पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स | पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी | पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली | फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईसक्रीम

# 'सुसंस्कारी' पपणबाई जाधव



कै.पपणबाई नामदेव जाधव यांचा जन्म १ जुलै १९५४ ला झाला. साडे येथील कै.विठोबा घाडगे हे त्यांचे वडील होते. त्यांना एकूण चार भाऊ व दोन बहिणी होत्या. सातवीचे शिक्षण झाल्यानंतर शेलगाव क येथील नामदेव गोविंद जाधव (गुरूजी) यांचेबरोबर १४ मे १९६८ ला त्यांचा विवाह झाला. विवाहनंतर त्यांनी आपल्या परिवारात अतिशय निष्ठेने, जोमाने कष्ट करून आर्थिक स्थिती उन्नत करण्याचा प्रयत्न केला.

विशेष म्हणजे त्यांनी आपल्या नणंद जनाबाई व त्यांचा परिवार यांच्याशी ऐक्याचे संबंध ठेवून गावातील शेती विकसित केली व एकाच घरात राहुन दोन्ही कुटूंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. शेतात विहिर पाडून विहिर बागायत केली. आपल्या मुलांबरोबर आपल्या भाच्च्यांवरही त्यांनी प्रेम करून शिक्षणासाठी प्रवृत्त केले. पपणबाई जाधव यांना तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित व सुसंस्कृत बनवले आहे. मोठा मुलगा जयकुमार जाधव हा अभियंता असून करमाळा येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत आहे. दुसरे चिरंजीव विजयकुमार यांनी करमाळा येथे प्रभारी तहसीलदार म्हणून उत्कृष्ट काम करून सध्या पंढरपूर येथे नायब तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. तिसरा मुलगा प्रमोद जाधव हा कर्मवीर मामासाहेब जगदाळे बार्शी येथील उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मुलगी अंबिका एससीसी पर्यंत शिक्षण घेऊन तिचा विवाह गावातील भाऊराव शिंदे या शिक्षकाबरोबर करून दिलेला आहे. मुलगी सध्या पारगाव (ता.भूम) येथे राहत आहे.

कै.पपणबाई यांनी आपल्या मुलांबरोबरच आम्हा भाच्च्यांनाही सुसंस्कारीत करून शिक्षणासाठी पाठबळ दिले. त्यांच्यामुळेच मला प्राध्यापक होता आले, एवढेच नव्हेतर डॉक्टरेटही मिळवता आली आहे. ७१ वर्षाच्या आयुष्यात कै.पपणबाई जाधव यांनी सर्वांची जमेल अशी सेवा केली असून अनेकांना सुसंस्कारीत केले आहे. अध्यात्माचा त्यांना मोठा वारसा असून ह.भ.प.चंद्रभान महाराज मसलेकर(नेवासा) यांचा त्यांना अनुग्रह लाभलेला आहे.

सर्वांशी मायेने व जिव्हाळ्याने त्यांनी नाते जोडलेली असल्याने त्यांच्या जाण्याने जाधव परिवारच नाहीतर संपूर्ण शेलगाव वासियांना दु:ख झाले आहे. त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली

**...प्रा.डॉ.पांडूरंग शिंदे**
शेलगाव-कुईवाडी

# पिस्तुलाचा धाक दाखवून सोन्याची चैन पळवली

करमाळा(संप्र.) : मोटारसायकल स्वारास रस्त्यात आडवून पिस्तुल दाखवून गळ्यातील १ लाख ६० हजार रूपये किंमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन काढून घेतली आहे. हा प्रकार १४ मे २०२५ रोजी दुपारी एक वाजता आवाटी दर्गाह च्या पुढे घडला आहे. या प्रकरणी दत्तात्रय दगडू मोरे (रा.पोटेगाव, ह.रा.पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी पुणे येथे कुदळवाडी चिंचवड येथे पेट्रोप पंपावर काम करतो. माझे नातेवाईक सागर हजारे यांचे डोंजे येथे जागरण गोंधळ असल्याने १३ मे ला डोंजे येथे आलो होते. येताना माझ्या मित्राची सोन्याची चैन घेऊन आलो होतो. १४ मे ला मी परत पुणे येथे निघालो असताना आवाटी दर्गाहच्या थोडे पुढे गेल्यावर दुपारी एक वाजता पाठीमागून दोघेजण मोटारसायकलवर आले व त्यांनी आमचे तुझ्याकडे काम आहे, असे म्हणून माझी मोटारसायकल थांबवली. त्यानंतर त्यांनी माझ्यावर अंगावर पिस्तुल रोखून गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चैन काढून घेऊन ते निघून गेले. त्यानंतर मी २१ मे ला येऊन फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# प्रतिज्ञ दुनाखे याचा नारायण पाटील पतसंस्थेच्या वतीने सत्कार

करमाळा(सं.प्र.): दहावीच्या परीक्षेत ९२.९५ टक्के भारत हायस्कुल जेऊर मध्ये प्रथम क्रमांक आल्याबद्दल प्रतिज्ञ भूषण दुनाखे याचा लोकनेते नारायण आबा पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. प्रतिज्ञ हा पाटील पतसंस्थेतील कर्मचारी भूषण यांचा मुलगा आहे. दहावीच्या परीक्षेत कठीण परिस्थितीतून अभ्यास करत प्रतिज्ञ दुनाखे याने मोठे यश मिळवले आहे. त्यामुळे पतसंस्थेच्या वतीने प्रतिज्ञ दुनाखे याचा सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन महेशकुमार दोशी, माजी चेअरमन धुळाभाऊ कोकरे, सचिव प्रा.विलास ठोकळ, मॅनेजर शेख साहेब, भूषण दुनाखे व अन्य कर्मचारी, सभासद उपस्थित होते.



श्वेता गिफ्ट & टॉईज
लहान मुलांसाठी सर्व प्रकारची खेळणी व भेटवस्तू डिस्काऊंट प्राईज मध्ये उपलब्ध !
सर्व प्रकारच्या बॅटरी ऑपरेटेड थार (जीप) व कार मिळतील.
टीप : बॅटरी ऑपरेटेड कार विक्री व दुरुस्ती
चिमुकल्यांच्या आनंदात भर पडेल असे गिफ्ट वाढदिवसाला द्या..!
■ इलेक्ट्रीक कार
■ इलेक्ट्रीक बाईक
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
मो.9822058106
Shweta Gift & Toys

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
9172927337
7588506719

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

Scanned with OKEN Scanner

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात

## काँग्रेस आय पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाकडे मागणी



करमाळा(सं.प्र.): ईव्हीएम मशीन मधून निवडणुकांमध्ये घोटाळे होत असल्याचा आरोप करत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात; अशी मागणी काँग्रेस आय पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाकडे करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय चे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी करमाळा येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीत ही मागणी केली आहे. बैठकीपूर्वी शहरातील पंजाब वस्ताद चौकातून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोहन जोशी यांच्या स्वागतासाठी मिरवणूक काढली. फटाक्यांच्या आताषबाजीत त्यांच्या आगमनाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. करमाळा तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीला राहुल जगताप, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष गफूर शेख, जावेद शेख, किसान मोर्चा अध्यक्ष दादासाहेब कुदळे, संभाजी शिंदे, शहराध्यक्ष सुजय जगताप, अशोक घरबुडे, देवराव सुकळे, निकेश चव्हाण, भगवान डोंबाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मोहन जोशी म्हणाले, की काँग्रेस आय पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणार असून कार्यकर्त्यांनी आत्तापासूनच निवडणुकीच्या तयारीला लागावे. स्थानिक पातळीवरील योग्य पक्ष व गटाशी युती केल्यास प्रदेश काँग्रेस तर्फे त्यास मान्यता दिली जाईल; असेही त्यांनी स्पष्ट केले. सोलापूर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्ष पदासाठी लवकरच नाव जाहीर करण्यात येईल; अशीही माहिती जोशी यांनी दिली. करमाळा तालुका अध्यक्ष प्रताप जगताप हे जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक असून सर्व इच्छुकांशी चर्चा करून एकमताने नव्या जिल्हाध्यक्षाची निवड केली जाईल; असे मोहन जोशी यांनी सांगितले.

यावेळी प्रताप जगताप यांनी मोहन जोशी यांचे स्वागत करत त्यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली. जोशी यांनी जगताप यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगत, पक्षवाढीसाठी त्यांच्या नेतृत्वाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे संकेत दिले. शेवटी जोशी यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. आगामी निवडणुका मोठ्या ताकदीने लढविण्यात येतील आणि प्रताप जगताप यांना जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी द्यावी; अशी मागणी उपस्थितां कडून करण्यात आली.

## वीस वर्षाची युवती बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : वंजारवाडी येथील वीस वर्षाची युवती बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी पालकांनी करमाळा पोलीसात हरवल्याबाबतची तक्रार २३ मे ला नोंदविण्यात आली आहे.

**सा.कमलाभवानी संदेश**
**वार्षिक वर्गणी २०० रू.**

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दुष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# भारतीय सेनेच्या सन्मानार्थ करमाळा येथे तिरंगा रॅली



करमाळा(सं.प्र.) : जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे धर्म विचारून आतंकवाद्यांनी भारतीय नागरीकांना गोळ्या घालून ठार केले होते. यावर भारत सरकारने लष्काराला आदेश देऊन पाकिस्तानला धडा शिकवला. या ऑपरेशन दरम्यान भारतमातेच्या वीरपुत्रांनी दाखविलेले शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ करमाळा शहरात भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. किल्लावेस येथील श्री खोलेश्वर मंदिर येथून सुरू झालेली तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांना अभिवादन करून राष्ट्रगीताने संपन्न झाली. या रॅली मार्गात शहरवासियांनी रॅलीवर विविध ठिकाणी पुष्पवृष्टी केली. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे डॉ.श्रीराम परदेशी, भाजपा नेत्या रश्मी बागल, जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, शिवसेनेचे दिग्विजय बागल, जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव,रामा ढाणे, काकासाहेब सरडे, सचिन पिसाळ, माजी सैनिक हंसराज पाटील, किरण बोकन, दिपक चव्हाण, नितीन झिंजाडे, सोमनाथ घाडगे, आजिनाथ सुरवसे, संदिप काळे, विकास गायकवाड, लक्ष्मण शेंडगे, हर्षद गाडे, महिला आघाडीच्या राजश्री खाडे, संगीता नष्टे, प्रियंका गायकवाड, सागर गायकवाड, विष्णू रंदवे, नागनाथ केकान, बंडू शिंदे, प्रकाश ननवरे, मयुर देवी, सय्याजी जाधव, ईश्वर मोरे, दिगंबर राखुंडे, सचिन कानगुडे, गणेश वाळुंजकर, संतोष जमदाडे, गणेश वार्शिबेकर व शहर व तालुक्यातील जनता व भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स**
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी, कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)

प्रवेश सुरू विश्वास तुमचा..! मार्गदर्शन आमचे..!! यश तुमचे..!!! प्रवेश सुरू
करमाळा शहरातील एकमेव शासनमान्य संस्था
**अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट**
✻ कॉम्प्युटर टायपिंग.....
- इंग्रजी : ३०, ४० श.प्र.मि.
- मराठी : ३०, ४० श.प्र.मि.
- हिंदी : ३०, ४० श.प्र.मि.

प्रवेश प्रक्रिया सुरू आहे
- सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
- महिला व मुलींसाठी स्वतंत्र बॅच
- महिला व मुलींसाठी महिला शिक्षिका
- ऑनलाईन टायपिंग सराव
- अनुभवी शिक्षक वृंद • १००% यशाची खात्री
- मोफत इंटरनेट व वाय-फाय सुविधा उपलब्ध

टीप : बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना एस.टी.पासची सोय.
पत्ता
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
किल्ला विभाग, जुन्या कोर्टासमोर, करमाळा., जि.सोलापूर.
संस्था कोड : २३०६४ (संगणक अभ्यासक्रम कोड : २३०६४०२११८३०)
संपर्क : श्री.अलोक आवाड (मो.८०८७९०५०८५)

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस

प्रोप्रा : अमरजित साळुंके (मो.९८२३३७१४५७)
फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे अधिकृत विक्रेते
• नवीन पत्ता •
बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.

## माथाडी कामगारांचे लाक्षणिक उपोषण



करमाळा(सं.प्र.) : माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ.बाबा आढाव व कामगार नेते आमदार नरेंद्र पाटील यांच्या आदेशानूसार कामगार आयुक्त मुंबई येथे कामगार नेते आमदार शशिकांत शिंदे, सरचिटणीस बळवंत पवार, सरचिटणीस सुभाष लोमटे, उपाध्यक्ष राजकुमार घायाळ तसेच माथाडी व सुरक्षा रक्षक कायदा बचाव कृती समिती, म.राज्य यांचे वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले; अशी माहिती करमाळा तालुका हमाल पंचायत अध्यक्ष ॲड.राहुल सावंत यांनी दिली. माथाडी कायद्याची राज्यात काटेकोर अमंल-बजावणी झालीच पाहिजे. पेन्शन सर्व कष्टकऱ्यांना विनासहभागी मिळालीच पाहिजे. राज्यातील माथाडी मंडळे कार्यक्षम झालीच पाहिजेत. या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.

प्लॉट विकणे आहे
यशोदीप मंगल कार्यालयाच्या मागील बाजूस व सदाशिव पार्क जवळ असलेला
१७५० स्क्वे.फुट प्लॉट
विकणे आहे.
• संपर्क •
मो.8087555982

## उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान
## सहा जणांवर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : मोहिमे दरम्यान रस्त्याच्याकडेचे अतिक्रमण आहे त्या स्थितीत ठेवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असताना अतिक्रमण धारकांनी पुन्हा अतिक्रमण करून पत्रे जोडून घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याप्रकरणी सहाजणांवर करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी न.पा.चे मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की करमाळा शहरातील श्रीदेवीचामाळकडे जाणाऱ्या रस्त्याच्याकडेला नगरपरिषदेच्या मालकीचा सर्व्हिस रोड आहे. या रस्त्यावर टपरीधारकांनी अतिक्रमण केल्याने नगरपरिषदेच्या वतीने सप्टेंबर २०२४ मध्ये अतिक्रमण काढण्याची मोहिम राबविण्यात आली होती. त्यामध्ये या रस्त्याच्या कडेचे अतिक्रमण काढण्यात आले होते. परंतु अतिक्रमण धारकांनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने अतिक्रमण आहे त्या स्थितीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. असे असताना देखील यातील टपरीधारक बबन चांदगुडे, शेखर इंदुरे, केतन इंदुरे, अंकुशखाने (ओम ऑटोमोबाईल), अजय खंडागळे आणि जितेंद्र चांदगुडे (बँक ऑफ इंडिया ग्राहक सेवा केंद्र) सर्व रा.करमाळा या सहा जणांनी सदर अतिक्रमण जागेवर पुन्हा टपऱ्या टाकलेल्या आहेत. तसेच अतिक्रमण काढण्याचे मोहिमेमध्ये काढलेले पत्रे सुध्दा जोडून घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला आहे. मुख्याधिकारी तपसे यांच्या फिर्यादीवरून करमाळा पोलीसांनी वरील सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जिल्हाधिकारी यांचा आदेश झुगारून रास्ता रोको - सात जणांवर गुन्हे दाखल

करमाळा(सं.प्र.) : पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी आदेश असताना तसेच सनदशीर मार्गाने मागणी सोडवण्यास सुचवले असतानाही रास्ता रोको आंदोलन केल्या प्रकरणी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष सह सात जणांवर करमाळा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल गणेश सुभाष दळवी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की दहिगाव उपसा सिंचन योजनेचे बंद पडलेले काम तात्काळ चालू करण्याच्या मागणीसाठी करमाळा-कुर्डूवाडी रस्त्यावरील अर्जुननगर फाटा येथे १६ मे रोजी रस्ता अडवून घोषणा देत रास्ता आंदोलन केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे यांनी रस्ता रोको करणाऱ्यांना पाच किंवा पाच पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास मनाई आदेश असल्याचे तसेच रस्त्यावर वाहने आडवणे बेकायदेशीर असल्याचे सांगितले. मात्र समजावून सांगूनही ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने सदरचे आंदोलन सुरूच ठेवले. या फिर्यादीवरून विवेक येवले (करमाळा), आशिष गायकवाड (देवळाली), शितल क्षीरसागर (करमाळा), भरत अवताडे (फिसरे), हनुमंत मांढरे-पाटील (करमाळा), विलास राऊत (घोटी), विकास वीर (शेलगाव क) या सात जणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## पिता-पुत्रास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : बांधाच्या कारणावरून एकाने पिता-पुत्रास कोयत्याने मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार गुलमोहरवाडी येथे १७ मे ला सायंकाळी सात वाजता घडला आहे. या प्रकरणी राजाराम यदा काळे (रा.गुलमोहरवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १७ मे ला सायंकाळी सातच्या सुमारास मी व माझा मुलगा अक्षय आमच्या घरासमोर असताना आमच्या शेताचा बांधकरी राजाराम सुभाष माळशिकारे हा आला व तु बांध सरळ करून दे.. असे म्हणाला. त्यावेळी मी त्याला बांध बरोबर आहे, शंका असेलतर सरकारी मोजणी करून घे.. असे म्हणालो असता राजाराम याने ऊस तोडायच्या कोयत्याने माझ्या हातावर मारले व माझ्या हाताच्या दंडाचा चावा घेतला. त्यावेळी माझा मुलगा भांडण सोडवण्यास आला असता त्याच्याही डाव्या हाताच्या तळव्यावर माळशिकारे याने कोयत्याने मारहाण केली.

## भावकीबरोबर भांडायला का येत नाही म्हणून दगडाने मारहाण

करमाळा(सं.प्र.) : भावकीबरोबर भांडायला का येत नाही म्हणून एकास दगडाने मारहाण करण्यात आली आहे. हा प्रकार १८ मे ला सायंकाळी सहा वाजता विहाळ येथे घडला आहे. या प्रकरणी सचिन वैजिनाथ मारकड (रा.विहाळ) यांनी फिर्याद दिली आहे. १८ मे ला सायंकाळी सहा वाजता मी माझ्या घरासमोर असताना माझा चुलता तात्या शंकर मारकड हा आला व तु आपल्या भावकीबरोबर भांडण करायला का येत नाही.. असे म्हणाला. त्यावेळी मी त्यांना भांडण करू नका असे समजावून सांगताना तु मला कोण समजावून सांगणार.. असे म्हणून त्याने पडलेला दगड हातात घेऊन माझ्या डोक्यात मारुन जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

स्वयंपाकी पाहिजे
मातोश्री वृध्दाश्रम (पांडे) येथे स्वयंपाकासाठी महिला पाहिजे
राहणे व खाण्याची सोय शिवाय योग्य मानधन मिळेल.
इच्छुक महिलांनी संपर्क साधावा..!
संपर्क : मो.नं.9689664994

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

श्रीकांत इलेक्ट्रीकल्स & एसी सर्व्हीस
सावंतगल्ली, करमाळा.
एसी सर्व्हीस व मेंटनन्सची सर्व कामे केली जातील.
(प्रोप्रा : शिवाजी वीर) मो.9423333956, 7588482356, 7588392837

Scanned with OKEN Scanner

## जेऊर येथे मटका घेणाऱ्या दोघांविरूध्द कारवाई

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथे कल्याण मटका घेणाऱ्यावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १६ मे ला सायंकाळी ४ वा. २५ मि. घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल योगेश विठ्ठल येवले यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जेऊर येथे रेल्वे स्टेशनच्या बाजुला नंदकुमार दादू कसबे रा.ज्ञानेश्वरनगर, जेऊर हा स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता कल्याण मटक्याचे आकडे फाडताना आढळून आला आहे. त्याच्याकडून पांढऱ्या रंगाची स्लिप बुक, निळ्या रंगाचा बॉलपेन व रोख २३८० रूपये जप्त केले आहेत. जेऊर येथे बाजारतळा जवळ अफताब महेबुब शेख रा.पांडे हाही कल्याण मटक्याचे आकडे घेताना आढळून आला आहे. त्याच्याकडून ११ हजार ९६० रूपये जप्त करण्यात आले आहेत. याची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल अमोल शहाजी रंदील यांनी दिली या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

## बस मधून ३ लाख ८ हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : बस मधून प्रवास करताना महिलेच्या पिशवीतील सोन्याच्या दागिण्यांची चोरी झाली आहे. हा प्रकार १५ मे ला दुपारी एक वाजता जेऊर बसस्थानक ते आदिनाथ साखर कारखाना या प्रवासादरम्यान घडला आहे. या प्रकरणी उर्मिला आनंदकुमार कोंडलकर रा.लव्हे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १५ मे ला माझ्या मावसभावाच्या लग्नासाठी निघालो होतो. जेऊर येथे एकच्या सुमारास पंढरपूरकडे जाणाऱ्या बसमध्ये बसले असता, एकच्या सुमारास आदिनाथ कारखान्या जवळ आल्यावर मी माझ्या बॅगेतील दागिणे चेक केले असता, २ लाख ३८ हजाराचे तीन तोळे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठन व ७० हजार रूपयाचा १ तोळा वजनाचे सोन्याचा टोकर चोरीला गेल्याचे लक्षात आले. या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## वांगी नं.३ येथे वाळूची चोरी करणाऱ्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.३ येथील उजनी पात्रातून वाळूची चोरी करणाऱ्यावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १६ मे ला पहाटे ३ वा. १० मि. घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ महादेव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की वांगी येथून वाळू चोरी होत असल्याची माहिती समजल्यावर पोलीस निरीक्षक रणजित माने, हवालदार गवळी, पोलीस नाईक पवार, पोलीस नाईक ठेंगल, पोलीस कॉन्स्टेबल गोसावी, पोलीस कॉन्स्टेबल गटकुळ, पोलीस कॉन्स्टेबल घोंगडे व पोलीस कॉन्स्टेबल आलदर असे आम्ही सर्वांनी मिळून वांगी नं.३ येथे उजनी जलाशयाकडे जाताना समोरून पांढऱ्या रंगाचा लेलॅन्ड टेम्पो आढळून आला. सदरचा टेम्पो पाहिला असता त्यामध्ये १ लाख ८० हजार रूपयाची १८ ब्रास वाळू आढळून आली. सदर टेम्पोत सुहास भारत तावसे रा.वांगी नं.३ व त्याच्या शेजारी राजेश महेंद्र रोकडे हा बसलेला होता. सदरचा टेम्पो थांबवण्यास सांगूनही तो थांबला नाही. त्यामुळे त्याचा पाठलाग करून त्यास आडवून तो टेम्पो जप्त केला आहे. टेम्पो व वाळू असा ४ लाख ९० हजाराचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

## चोरीच्या उद्देशाने लपलेल्यास अटक

करमाळा(सं.प्र.) : चोरीच्या उद्देशाने स्वत:चे अस्तित्व लपवून लपून बसलेल्या प्रौढास पोलीसांनी अटक केली आहे. हा प्रकार १६ मे ला रात्री साडेअकरा वाजता करमाळा शहरात केत्तूर नाक्याजवळ घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मिलींद दशरथ दहिहंडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १६ मे ला रात्री गस्त घालत असताना केत्तूर नाका परिसरात नामदेव बबन चुनाडे (वय-५२, रा.अनिलनगर, पंढरपूर) हा अंधाराचा फायदा घेऊन स्वत:चे अस्तित्व लपवून चोरी करण्याच्या उद्देशाने लपून बसलेला आढळला. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.


डॉ.साळुंके
स्कीन केअर क्लिनीक
त्वचा रोग निदान व उपचार



डॉ.रोहीत दिगंबरराव साळुंके
B.A.M.S., D.Derma(Ay)(Pune)
त्वचा व केशविकार तज्ञ

त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, सोयरायसिस, काळे डाग, पिंपल्स, चाई, कोड, स्ट्रेच मार्क, केस गळती, केसातील कोंडा, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या, नखाचे आजार, सुरमा

वेळ : सकाळी १० ते दुपारी २ व सायं.४ ते ८ पर्यंत (रविवारी सुट्टी राहील.)

पत्ता : कमलादेवी रोड, करमाळा. (9404692188, 7387376531)


## सोन्याचे बिस्कीट सांगून ६० हजाराची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : तुमच्या गळ्यात कमी सोने आहे, आम्ही तुम्हाला जास्त सोने देतो, तुम्ही तुमच्या गळ्यातील सोने द्या.. असे म्हणून व सोन्याचे सांगून पितळाचे बिस्कीट देऊन महिलेची ६० हजार रूपयाची फसवणूक केली आहे. हा प्रकार करमाळा शहरात दत्तपेठत १६ मे ला दुपारी साडेचार वाजता घडला आहे. या प्रकरणी मांगी येथील सरूबाई मारूती शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की १६ मे ला सायंकाळी साडेचारच्या सुमारास मेनचौकातून दत्तपेठ येथे येत असताना एक माणूस मला भेटला. तो म्हणाला, आजी माझे सोन्याचे दागिणे पडले होते. एक माणूस उचलून घेऊन गेला आहे. आपण त्याच्याकडे जाऊ असे म्हणत होता. त्याचवेळी दुसरी एक व्यक्ती आली व छातीवर मारून एक माणूस माझे १२ तोळे सोने घेऊन गेला आहे.. तुम्ही चला असे म्हणाला. त्यांना मदत करण्याच्या विचाराने मी त्या दोन इसमाबरोबर थोड्या अंतरावर चालत गेले. आडबाजुला बोळात गेलो असता ते दोघेजण म्हणाले, तुमच्या गळ्यात सोने कमी आहे. तुम्हाला आम्ही जास्त सोने देतो.. असे म्हणून त्यांच्या जवळील सोन्याचे बिस्कीट दिले व मी त्यांना माझ्या गळ्यातील सोन्याचे डोरले व कानातील फुल काढून दिले. त्यानंतर मी घरी आल्यावर ते बिस्कीट पाहिले असता ते पितळेचे बिस्कीट निघाले आहे. यावरून या दोन लोकांनी माझी ६० हजार रूपयाची फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## गांजा खैसणाऱ्याची गय नाही

### पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गांजा पिणाऱ्या व्यक्तीवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये १८ मे २०२५ रोजी सायंकाळी पावणेसात वाजता बाळू बाबा गोडसे (रा.रंभापुरा, करमाळा) हा नागोबा मंदिराजवळ चिलीमच्या सहाय्याने गांजा ओढताना आढळून आला आहे. त्याचप्रमाणे सायंकाळी सहा वाजता करमाळा येथील ३६ एकर भागात प्रविण लक्ष्मण साडेकर (रा.भवानीपेठ) हा चिलीमच्या सहाय्याने गांजा ओढताना आढळून आला आहे. तसेच याच ३६ एकर भागात माधव मुरलीधर ननवरे (रा.म्हसेवाडी, ता.करमाळा) हा ही चिलीमच्या सहाय्याने गांजा ओढताना आढळून आला आहे. त्याचप्रमाणे पांडे येथील सरपंच हॉटेलच्या आडोशाला बसून विठ्ठल एकनाथ इंदूरे (रा.वडगाव धावरी, पुणे) हाही चिलीमच्या सहाय्याने गांजा ओढताना आढळून आला आहे. तसेच जब्बार ईस्माईल पठाण (रा.दत्तपेठ, करमाळा) हा देवळाली येथील ग्रामपंचायतीजवळ चिलीमच्या सहाय्याने गांजा ओढताना आढळून आला आहे. या सर्वांच्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


डॉ.जांभळे इमॅजींग सेंटर & पॅथॉलॉजी लॅब
बसस्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर, पहिला मजला, करमाळा.
पाहिजेत
2) RECEPTIONST - 2
इच्छुक मुले/मुली यांनी पगाराचे अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा..!
संपर्क : मो.नं.9021909262



एस.एस.के.एस. असोसिएटस्

अकौंटंट मॅनेजर पाहिजे
पगार : १५ ते २५ हजार रू.
कामाचा अनुभव : ३ ते ७ वर्ष अकौंट क्षेत्रात मॅनेजर म्हणून कामाचा अनुभव असावा.

अकौंटंट असिस्टंट पाहिजे
पगार : ५ ते १० हजार रू.
कामाचा अनुभव : ० ते ३ वर्ष अकौंट क्षेत्रात असिस्टंट कामाचा अनुभव असावा

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)
पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टसमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.
टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.





मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner